मा कोर्ट

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस ठाणे ठाणे शहर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** मुंब्रा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1563 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/09/2025 07:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 26/09/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/09/2025

**Time From (वेळेपासून):** 13:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/09/2025 **Time (वेळ):** 07:12 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/09/2025 07:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दालनासमोरील पसेजमध्ये,मुंब्रा पोलीस स्टेशनच्या , वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या,मुंब्रा ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गोकुळ ज्ञानदेव लांडगे

(b) **Guardian's Name (पालक चे नाव) :** ज्ञानदेव

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | आधार कार्ड | 861532929635 |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 105,घणसोली, प्लट क्र10, सेक्टर 21, , नवी मुंबई,जि ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 105,घणसोली, प्लट क्र10, सेक्टर 21, , नवी मुंबई,जि ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9029612212

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शशिकांत लक्ष्मण भालेराव | | | 1. मुंब्रा पोलीस स्टेशन, , ठाणे शहर ,मुंब्रा,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्यादीने फिर्याद दिल्याने तात्काळ दाखल

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी, श्री. गोकुळ ज्ञानदेव लांडगे, वय - 40 वर्षे, व्यवसाय - शेती, रा.फ्लॅट क्र.105, प्लॉट क्र.10, सेक्टर 21, घणसोली, नवी मुंबई, जि.ठाणे ठाणे, मो.नं. 9029612212 अधारकार्ड नं:- 861532929635 फिर्याद लिहुन देते की,

मी वरील ठिकाणी माझे कुटूंबासह रहात आहे. दिनांक 24/09/2025 रोजी मुंब्रा पोलीस स्टेशन येथील लोकसेवक श्री. शशिकांत भालेराव यांनी माझेविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयात मदत करतो असे सांगून 50,000/- रूपयांची लाचेची मागणी केली होती. त्यामुळे मी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथील कार्यालयात प्रत्यक्ष मा.पोलीस अधीक्षक यांना जावून भेटलो. तेव्हा माझे तक्रारीची थोडक्यात माहिती विचारण्यात आली. त्यानंतर मा.पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे कक्षात पोनि.श्री.संतोशनावलगी यांना बोलावून माझी ओळख करून देवून माझे तक्रारीचे अनुशंगाने लोकसेवक यांचेविरूध्द कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आला.

त्यावेळी पोनि.श्री.संतोष नावलगी यांनी मला त्यांचे केबिनमध्ये घेवून गेले. तेव्हा मला त्यांनी माझे तक्रारीची हकिकत विचारली. त्यानंतर मला माझी तक्रार स्वःहस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितली. मी दिलेल्या तक्रारीचा आशय पुढील प्रमाणे ''माझे विरुध्द मुंब्रा पोलीस ठाणे येथे बोगस डॉक्टर संदर्भाने गु.रजि.क्रं. 1235/2025, दि. 17/07/2025 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्या गुन्हयामध्ये मला अटक करण्यात आलेली असून दि.29/07/2025 रोजी पासून कोर्टाने जामिनावर सोडलेले आहे. माझे विरुध्द दाखल गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार श्री. शशिकांत भालेराव हे करीत आहे. त्या गुन्हयामध्ये कोर्टाने महिन्याचे प्रत्येक रविवारी 12 ते 05 वाजे दरम्यान गुन्हयाचे तपास करणारे पोलीस अधिकारी यांचेकडे हजेरी देण्याबाबत आदेश दिलेले आहेत. तरी पण माझे डावे पायाचे दुखापतीमुळे मी एक महिना हॉस्पीटलमध्ये दवाउपचार घेत होतो. त्याबाबतचे डॉक्टरांचे सर्टिफिकेट मी पोलीस ठाण्यामध्ये दिलेले होते. त्यामुळे मला आजारपणामुळे पोलीस ठाण्यामध्ये हजेरी लावता येत नव्हती. त्यानंतर मला बरे वाटल्यानंतर दि.13/09/2025 (शनिवारी) मी पोलीस हवालदार श्री.भालेराव यांना मुंब्रा पोलीस ठाण्यामध्ये भेटण्यास गेलो होतो. त्यावेळी त्यांनी मला तुझेविरुध्द चॅप्टर केस करतो असे सांगितले होते. त्याप्रमाणे मुंब्रा पोलीस ठाण्याकडून आज दि.24/09/2025 रोजी माझेवर चॅप्टर केस करण्यात आलेली आहे. या चॅप्टर केसच्या दरम्यान मुंब्रा पोलीस ठाण्यामध्ये मला पोलीस हवालदार श्री.भालेराव यांनी मला ''पन्नास हजार रुपये दे, मी तुला तुझे विरुध्द दाखल गुन्हयामधील कलमे कमी करुन गुन्हयाचे गंभीर स्वरुप कमी करतो. तसेच गुन्हयामध्ये जप्त असलेली दुचाकी परत करुन गुन्हयाचे चार्जशिट लवकरात लवकर दाखल करुन गुन्हयाचे तपासामध्ये मदत करतो'' असे म्हणाले होते.

त्याकरीता उदया दि.25/09/2025 रोजी मी माझेविरुध्द दाखल गुन्हयाचे सबंधाने व त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत पोलीस हवालदार श्री. शशिकांत भालेराव यांची त्यांचे मुंब्रा पोलीस ठाण्यामधील कार्यालयामध्ये जावून भेट घेणार आहे. त्यावेळी ते माझेकडे पुन्हा लाचेची मागणी करण्याची दाट शक्यता आहे. तरी पोलीस हवालदार श्री. शशिकांत भालेराव हे मागत असलेली रक्कम ही अवैध लाचेची रक्कम असल्याने व मला पोलीस हवालदार यांना ती लाचेची रक्कम देण्याची अजिबात इच्छा नसल्याने त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द आपले विभागाकडून कारवाई करण्याबाबत माझी तक्रार आहे. पोलीस हवालदार श्री. शशिकांत भालेराव यांचे सोबत माझे कोणत्याही स्वरुपाचे जुनै वैर तसेच कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत.'' अशा मजकूराची तक्रार देण्यात आली होती.

दिनांक 25/09/2025 रोजी माझेविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाचे अनुशंगाने मुंब्रा पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार भालेराव यांना भेटण्यास जाणार असल्याने मी, पोनि.श्री.संतोष नावलगी यांना माझे तक्रारीचे अनुशंगाने पडताळणी कारवाई दिनांक 25/09/2025 रोजी करण्याची विनंती केली होती. त्याप्रमाणे पोनि.श्री.संतोष नावलगी यांनी मला रेणुका यल्लमा देवस्थान रेतीबंदर, मुंब्रा येथे 11.30 वा.पर्यंत उपस्थित राहण्यास सांगितले होते.

त्याप्रमाणे पोनि.श्री.संतोश नावलगी हे खाजगी वाहनाने रेणुका यल्लमा देवस्थान रेतीबंदर, मुंब्रा येथे आल्यानंतर मला वाहनात बसण्याचा इशारा केला. तेव्हा पोनि.श्री.संतोष नावलगी यांनी मला पडताळणी कारवाईसाठी आवश्यक असलेल्या शासकिय पंच, पडताळणी पथक व साधन सामुग्रीसह आलो असल्याचे सांगितले. दिनांक 24/09/2025 रोजी मी दिलेली तक्रार पंचांना वाचावयास दिली. दोन्ही पंचांनी सदरची तक्रार वाचून त्या तक्रारीवर सहया केल्या आहेत व समक्ष म्हणुन पोनि.श्री.संतोष नावलगी यांनी सही केली आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोनि.श्री.संतोश नावलगी यांनी दोन्ही पंचाशी विचारविनिमय करून तात्काळ पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कायदेशिर बाबींचा अवलंबन करून पंच साक्षीदार यांचे समक्ष पडताळणी कारवाई करण्यासाठी लोकसेवक श्री.भालेराव यांचे कार्यालयात पोहवा/महाडिक यांनी पिंटया शेटच्या बंगल्याचे समोरील रोडवर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टचे आतमधील बनियनच्या आतमध्ये लावुन तेथून पंच साक्षीदार नं.1 श्री.जाधव यांचे समवेत पडताळणी कारवाई करीता पायी चालत गेलो. मी व पंच नं. 1 श्री. जाधव असे लोकसेवक श्री.भालेराव यांना भेटण्याकरीता मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये पोहचलो असता, मला भालेराव साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे केबिनच्या बाहेर एका व्यक्तीशी बोलत असतांना मी त्यांना भालेराव साहेब नमस्कार असे बोललो. त्यावेळी भालेराव साहेब हे माझे सोबत असलेल्या पंचांकडे संशयारित्या पाहत असतांना मी पंच श्री.जाधव यांना दाजी तुम्ही थांबा बाहेर असे बोलून मी, भालेराव साहेब यांचे पाठोपाठ जावून त्यांचे कक्षामध्ये बाहेर थांबून होतो. थोडया वेळाने भालेराव साहेबांनी मला इशारा केल्यानंतर मी त्यांना सर येवू असे बोललो. त्यावेळी भालेराव साहेब हे रागाच्या स्वरात मला कशाला आलास?......काल झालं का तुझं? असे म्हणाले. त्यानंतर भालेराव साहेब यांनी माझेवर दाखल असल्याने गुन्हयाचे अनुषंगाने करण्यात आलेल्या चॅप्टर केसबाबत माझेशी चर्चा केली. त्यावेळी मी, भालेराव साहेब यांना गाडीच वैगरे कस काय..? असे विचारले असता, त्यांनी मला काय आणलय ? तेव्हा मी त्यांना नाय आणलं नाही काही....असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक भालेराव साहेब रागाच्या भरात काय सांगायच भोसडीच्या....त्यादिवशी सांगितल ना...शंभर वेळा तेच तेच सांगायच का तुला.... आं.....असे रागून बोलत होते. तेव्हा मी अहो सर एवढे अँडजेस्ट होत नाही ना...असे बोलून विनंती केली असता, त्यावेळी भालेराव यांनी मला मग किती आहेत...? ते आण ना...असे बोलले, तेव्हा मी पुन्हा एवढे अँडजेस्ट होत नाही ना.....असे बोलल्यानंतर भालेराव यांनी मला पुन्हा अरे मग किती आहेत..? असे विचारले. त्यांना मी थोडे फार कमी करा ना...अस...सर आताच घरी खर्च झालाय.....आता मी घरीच हे....असे सांगितले. त्यावेळी भालेराव साहेब यांनी मला तुला फायनल सांगतो परत विचारायचं नाही.!... असे बोलून वाचुन घे...पाहुन घे ते.. (एका कागदावर 25000 असा आकडयामध्ये रक्कम लिहुन दाखविली ) त्यावेळी मी भालेराव साहेब यांना सर पंचविस हजार आहेत...सर पण मदत काय कराल? असे विचारले असता, भालेराव साहेब यांनी मला घेवुन ये ना मग, सांगतो तुला जा.... असे बोलून लाचेची रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची संमती दिल्याचे दिसून आले. त्यानंतर मी त्यांचेशी गुन्हयाबाबत चर्चा केली. त्यावेळी भालेराव साहेब यांनी तु जोपर्यंत क्लियर करत नाही तोपर्यंत करणार नाही.... त्याच्यानंतर ते कसं करायंच ते मी ठरवणार, हे झाल्यानंतर मी ठरवतो कसं करायंच ते हा.... असे बोलले. तेव्ही मी त्यांना हे करतो मी सर, पण....असे सांगितल्यानंतर भालेराव साहेब यांनी मग जा ना, घेवुन ये ना....तुला सांगीतल. त्यानंतर मला भालेराव साहेब यांनी सगळ...सगळ...तु उदया घेवुन ये, घेवुन जा सगळ, काही हरकत नाही....जा चल असे बोलल्यानंतर मी त्यांना एवढे पुर्ण पंचविस....थोडे फार काही...असे बोललो असता, भालेराव साहेब माझेवर रागावल्याने मी व पंच पोलीस स्टेशनमधून बाहेर निघून आम्ही दोघेही पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत निघून आलो.

त्यानंतर पोनि.श्री.संतोष नावलगी यांनी दोन पंचासमक्ष पडताळणी घडलेला घटनाक्रम विचारले तसेच दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील माझे व लोकसेवक श्री.भालेराव यांचेतील संभाषण लक्षपुर्वक ऐकले असता, त्यात लोकसेवक श्री.भालेराव यांनी पडताळणी कारवाई दरम्यान दाखल गुन्हयात मदत करतो असे सांगून तक्रारदार यांचेकडे 25,000/- रूपये लाचेची रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

पोनि.श्री.संतोष नावलगी यांनी दोन्ही पंचाशी विचारविनिमय करून पोलीस हवालदार भालेराव यांनी उदईक रोजी पैसे घेवनू येण्यास सांगितले असल्याने पुढील सापळा कारवाई दिनांक 26/09/2025 रोजी करण्याचा निर्णय घेवून सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.

दिनांक 26/09/2025 रोजी लोकसेवक श्री. शशिकांत भालेराव यांना लाचेची रक्कम देण्यासाठी मुंब्रा पोलीस स्टेशन येथे बोलाविले असल्याने सापळा कारवाईसाठी लागणारी लाचेची रक्कम सापळापुर्व कारवाईसाठी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे उपस्थित राहण्यास सांगितले. अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे पोनि.श्री.संतोष नावलगी यांचे कक्षात सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोना/जाधव यांना अँन्थ्रासिन पावडर लावलेली 25,000/- रूपय लाचेची रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या बाजूच्या समोरील खिश्यात ठेवण्यास देऊन त्यांनी लाचेची रक्कम माझे

पॅन्टच्या उजव्या बाजूच्या समोरील खिश्यात ठेवुन दिली. सापळा कारवाईसाठी लागणा-या आवश्यक असलेल्या साहित्यासह शासकिय पंच, सापळा पथक व साधन सामुग्रीसह माझे व पोनि.श्री.संतोष नावलगी यांचे असे दोन्ही खाजगी वाहनाने अग्रीशामक दल केंद्र, मुंब्रा येथे पोहचलो. त्यावेळी सर्व कायदेशिर बाबींचा अवलंबन केल्यानंतर सापळा कारवाई लागलीच करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोनि.श्री.संतोष नावलगी यांनी पोहवा/महाडिक यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतमधील बनियनच्या आतमध्ये लावुन पंच साक्षीदार पंच नं. 1 श्री. जाधव असे पायी चालत लोकसेवक श्री.भालेराव यांना लाचेची रक्कम देण्याकरीता मुंब्रा पोलीस स्टेशन निघालो. आमच्या पाठोपाठ पायी चालत सापळा कारवाईचे अधिकारी व कर्मचारी असे मुंब्रा पोलीस स्टेशनच्या बाहेरील परिसरात थांबून होते. मी लोकसेवक श्री. भालेराव यांना भेटण्याकरीता मुंब्रा पोलीस स्टेशन येथे आत गेलो असता, मला भालेराव साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक रायटर कक्षात दिसून आले. भालेराव साहेब नमस्कार....येवु का? असे विचारले असता, भालेराव साहेबांनी मला कशाला आलास?....कशाला आला..? ठेव तिथं कपाटावर ( भालेराव साहेबांनी त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा व त्याच्या नजीकचे बोट एकमेकावर घासुन पैसेबाबत इशारा केला. त्यावेळी माझे पॅंटच्या खिशातुन पैसे बाहेर काढले असता कोप-यातील लोखंडी कपाटाकडे अंगुलीनिर्देश करून दाखविला ) त्यावेळी मी भालेराव साहेब यांना वरती ठेवु ?....सर ते कामाच... चाव्या वैगरे आजच दयालना....असे बोलून लाचेची रक्कम कोप-यातील लोखंडी कपाटावर ठेवून दिल्यानंतर मी लोकसेवक भालेराव साहेब यांचेशी कामासंबंधीत बोलून माझे गाडी व घराची चाव्या, पॉकेट व इतर साहित्य घेवून भालेराव साहेब यांचे कक्षाचे बाहेर आलो. त्यावेळी भालेराव साहेब हे सुध्दा त्याचे कक्षाचा दरवाजा बंद करून घेवून माझे पाठोपाठ आले. त्यानंतर मी लाचेची रक्कम स्विकारल्याने पुर्वनियोजीत सांकेतिक इशारा केला.

त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी लोकसेवक श्री.शशिकांत भालेराव यांना मुंब्रा पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या दालनासमोरील पॅसेजमध्ये 13.15 वाजता ताब्यात घेतले. त्यानंतर मी माझेकडील व्हाईस रेकॉर्डरची पोहवा/महाडीक यांनी काढून यांचे ताब्यात घेतली. मला पोलीस निरीक्षक संतोष नावलगी यांनी लोकसेवकाने स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे आहे अशी विचारणा केली असता लोकसेवक श्री. शशिकांत भालेराव यांनी मला त्यांचे कक्षातील कोप-यात असलेल्या लोखंडी कपाटावर लाचेची रक्कम ठेवण्यास सांगितल्यावरून कपाटावर ठेवली असल्याचे सांगितले. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष कोप-यात असलेल्या लोखंडी कपाटावरून लाचेची रक्कम ताब्यात घेतल्यानंतर सापळापुर्व पंचनामा कारवाई दरम्यान लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर टंकलिखीत करण्यात आलेल्या नंबर्स व ताब्यात घेण्यात आलेल्या नोटांचे नंबर तपासले असता, तंतोतन जुळुन आले. दोन्ही पंचासमक्ष अल्ट्राव्हालेट दिव्याचे सहाय्याने तपासणी केली असता नोटांवर अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म मिळून आले आहेत. त्याबाबतचे व्हिडिओ शुटींग करून चित्रण करण्यात आले आहे. तसेच संपुर्ण सापळा कारवाईत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करून मेमरी कार्डमध्ये माझे व लोकसेवक शशिकांत भालेराव यांचेत झालेले संभाषण ध्वनिमुद्रीत करुन सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

अशाप्रकारे दिनांक 17/07/2025 रोजी माझेविरूध्द मुंब्रा पोलीस ठाणे येथे बोगस डॉक्टर संदर्भाने गु.रजि. क्रं. 1235/2025 प्रमाणे गुन्हा दाखल असून गुन्हयात ताब्यात घेतलेली माझी स्कुटर परत देतो तसेच तपासात मदत करतो असे सांगून माझेकडे (एका कागदावर 25000 असा आकडयामध्ये रक्कम लिहुन दाखविली ) वाचुन घे...पाहुन घे ते.. असे तडजोडअंती 25,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेनुसार दिनांक 26/09/2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.शशिकांत लक्ष्मण भालेराव, पद - सहायक पोलीस उपनिरीक्षक यांनी माझेकडून 25,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारली असतांना 13.15 वा. रंगेहात पकडण्यात आले म्हणून माझी लोकसेवक श्री.शशिकांत लक्ष्मण भालेराव, वय 49 वर्षे, पद - सहायक पोलीस उपनिरीक्षक (वर्ग -3), नेमणूक - मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे मराठीत लॅपटॉपवर टंकलिखित करण्यात आली असून ती मी वाचून पाहिली असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
~~PARSHURAM MANOHAR LONDHE~~ PI नावळकी (ACB thane)
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
मुंब्रा पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): anil chandrakant shi
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI